# रिक्षाचालकांमुळे मिळाले नवदाम्पत्याचे दागिने

## आई-वडिलांना 'कॅब'मध्ये बसविताना मुलगा विसरला 'बॅग'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

> रिक्षाचालकांनी दाखविलेल्या प्रामाणिकपणामुळे दीपक चित्राला यांचे मौल्यवान दागिने सहजासहजी मिळाले, असे प्रत्येकाच्या बाबत घडेल, असे नाही. त्यामुळे प्रवाशांनी प्रवास करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे.
>
> – सुरेशसिंग गौड, वरिष्ठ निरीक्षक, लोहमार्ग पोलिस ठाणे

नवीन लग्न झालेल्या मुलाला आणि सुनेला भेटण्यासाठी आंध्र प्रदेशहून आलेल्या दाम्पत्याची मौल्यवान दागिन्यांची बॅग रेल्वे स्थानकाच्या आवारातच राहिल्याचा प्रकार रविवारी सकाळी घडला. त्या बॅगेत सुनेचे आणि मुलाचे लग्नातील साडे सात लाख रुपये किमतीचे दागिने होते. रेल्वे स्थानकातून हडपसरला घरी गेल्यानंतर स्थानकातच बॅग विसरल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे बॅगेच्या शोधासाठी पुन्हा रेल्वे स्थानकात गेलेला त्यांचा मुलगा लोहमार्ग पोलिस ठाण्यात पोहोचला आणि तेथे दागिन्यांची बॅग पाहून, अखेर त्याचा जीव भांड्यात पडला!

हडपसरमधील मगरपट्टा येथे नोकरीस असलेले दीपक चित्राला यांच्यासोबत ही घटना घडली. दीपक यांचे जानेवारी महिन्यात लग्न झाले. लग्नानंतर पहिल्यांदाच त्यांचे आई-वडील त्यांना आंध्र प्रदेशातून भेटण्यासाठी आले होते. ते काकीनाडा एक्स्प्रेसने रविवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानकात दाखल झाले. दीपक त्यांना घेण्यासाठी तेथे गेले होते. त्यांनी कॅब बुक केली होती. आई-वडिलांना गुडघेदुखीचा त्रास असल्याने त्यांना कॅबमध्ये बसविण्यासाठी दीपक यांची लगबग सुरू होती. आई-वडिलांना कॅबमध्ये बसविल्यावर दीपकदेखील गाडीत बसले. मात्र, त्या वेळी दागिन्यांची बॅग रेल्वे स्थानकातच राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही. ते बॅग विसरले. घरी पोहोचल्यानंतर बॅग रेल्वे स्थानकातच विसरल्याचे त्यांना कळले. तेव्हा दीपक लगेच पुन्हा रेल्वे स्थानकाकडे निघाले.

दरम्यान, रेल्वे स्थानकात प्रवासी मिळविण्यासाठी थांबलेल्या अतुल पांडुरंग टिळेकर (वय ३६, रा. चिंतामणी नगर, हडपसर), भरत किसन भोसले (४८, रा. गणेश पेठ) या रिक्षा चालकांना ही बॅग आढळली. त्यांनी बॅग लोहमार्ग पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक सुरेशसिंग गौड यांच्याकडे सुपूर्द केली.

गौड यांच्या सूचनेनुसार सहायक फौजदार संजय सोनवणे आणि कर्मचाऱ्यांनी बॅग उघडून पाहिली असता, त्यात चांदीची फुलदाणी, करंडा, तीन तोळे सोन्याचे मंगळसूत्र, चार तोळे सोन्याच्या चार बांगड्या, एक तोळे सोन्याची कर्णफुले, तीन तोळ्याचा नेकलेस, अर्धा तोळ्याची सोनसाखळी, पाच तोळ्याचा नेकलेस सेट असा एकूण सात लाख ५७ हजार रुपयांचा ऐवज आढळून आला. त्याच वेळी दीपक ठाण्यात पोहोचले. त्यांनी ओळख पटवून दिल्यानंतर पोलिसांनी ती बॅग दीपक यांच्याकडे सुपूर्द केली.

Scanned with CamScanner